<u>नि. यु.–8</u>
<u>**किरकोळ वसुली अर्ज (युएलपी) क.1/2018**</u>

**उलटतपास शपथेवर सुरू श्री.चंद्रकोर, वकील यांचेकडुन सामनेवालेकरीता**

**17.** माझे शिक्षण जुनी दहावी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की हिवताप जिल्हा मध्ये मी तात्पुरत्या स्वरूपामध्ये कामावर लागलो होतो. मला माहिती नाही की सन 1987 मध्ये भविष्य निर्वाह निधी व बोनस हे सर्व सुविधा मला होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की मुंबईच्या कोर्टाचा निकाल लागल्यानंतर मला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी उशीर झाला होता. मला माहिती आहे की सरकारने आता बोनस देणे बंद केले आहे.

**18.** हे म्हणणे खरे आहे की मी दिलेला माझ्या मागणीच्या तक्त्यामध्ये माझा रजेबद्दलचा तपशिल दिलेला नाही. आता मला यादी नि.यु.–2 अनु.क्र.1 दस्त दाखविला. हे म्हणणे खरे नाही की हिशोबाचा तक्ता मी स्वतः बनविलेला नाही. सदर तक्त्यास <u>नि. यु.–12</u> देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या हिशोबाचा तक्त्यासोबत माझा पगार प्रत्येक महिन्याला किती होता हे दाखविण्यासाठी कोणताही पगाराचा पुरावा लावलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला अर्जित रजा मिळविण्याचा अधिकार नाही.

**19.** हे म्हणणे खरे नाही की मी अवाजवी व खोटा हिशोब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या हिशोबाबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास नाही</u>.**

**<u>श्रवणी स्वीकृत मंजूर</u>.**

स्थळ : नाशिक.
दिनांक : 18/01/2019.

(श्रीमती. जमिला मो.इ. शेख)
न्यायाधीश,
दुसरे कामगार न्यायालय, नाशिक.